महापालिका आयुक्त कार्यालय
पुणे महानगरपालिका
जा.क्र.:- मआ/माम/१५६
दिनांक:- ०६/०५/२०२०

# कार्यालयीन आदेश

**विषय:- क्वारंटाईन /आयसोलेशन सेंटर तसेच कोव्हिड केअर सेंटर येथील द्यावयाच्या सुविधेबाबत**
**संदर्भ :- १. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५**
**२. साथरोग प्रतिबंध अधिनियम १८५७**

या कार्यालयामार्फत उपरोक्त संदर्भांकीत विषयाबाबत करावयाच्या कार्यवाहीबाबत आपणास वेळोवेळी लेखी स्वरूपात तसेच विविध बैठकांमध्ये सुस्पष्ट आदेश देण्यात आले आहेत. असे असतानाही सदर सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी आपण करीत नसल्याचे माझे निदर्शनास आले आहे.

I. **COVID-19** चा प्रादुर्भाव वाढल्यामुळे मे २०२० अखेर पुणे शहरात एकुण १०,००० बेड कोव्हिड केअर सेंटरची व्यवस्था करणे गरजेचे झालेले आहे. त्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, पुणे यांनी Requisition केलेल्या वसतीगृह आणि इतर संस्थांमध्ये कोव्हिड केअर सेंटर यांचेशी निगडित सर्व सोय-सुविधा पुरविणे आवश्यक राहील.

तसेच कोव्हिड बाधित लोकांचे CCC सोबतच प्रतिक्षाधीन संशयित लोकांसाठी तसेच निगेटिव्ह रिझल्ट असलेले असे लोक ज्यांना घरी quarantine होणे शक्य नाही त्यांचेसाठीसुद्धा केंद्र स्थापित करणे आवश्यक राहील.

II. वरीलप्रमाणे कोव्हीड बाधित/संशयित लोकांसाठी खालीलप्रमाणे व्यवस्था करण्याचे आदेश देण्यात येत आहे.

१) **कोव्हीड बाधित नागरिक** – परिशिष्ट 'ब' मध्ये उल्लेखित संस्था
२) **संशयित प्रतिक्षाधीन नागरिक**– संबंधीत वसाहतीमधील किंवा वसाहतीजवळील शाळा आणि मंगल कार्यालय
३) **निगेटिव्ह नागरिक** (ज्यांना Home quarantine शक्य नाही) :- संबंधीत वसाहतीमधील किंवा वसाहतीजवळील शाळा आणि मंगल कार्यालय
४) शाळा आणि मंगल कार्यालयाची यादी परिशिष्ट 'क' व 'ड' मध्ये उल्लेखित आहे, आवश्यकतेप्रमाणे सदर यादीमध्ये वाढ करण्यात येईल.

III. वरील CCC, शाळा, मंगल कार्यालयामध्ये सर्व व्यवस्था (Food Provisioning, Cleaning, Sanitation, Waste Disposal) करण्याची जबाबदारी नेमलेल्या संबंधीत संस्था प्रभारी अधिकारी यांची राहील. वरील CCC , शाळा, मंगल कार्यालयामध्ये स्थापत्य, विद्युत, आणि इतर पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी मनपाचे संबंधीत विषयाचे विभागप्रमुख यांची राहील. सर्व प्रकारचे आरोग्य साहित्य पुरविण्याची जबाबदारी मनपा आरोग्य प्रमुख यांची राहील.

वरीलप्रमाणे प्रशासकीय प्रमुख/प्रशासकीय सहायक अधिकारी आणि आरोग्य प्रभारी अधिकारी/आरोग्य सहायक अधिकारी यांची केंद्र/संस्था निहाय नियुक्ती उप आयुक्त (सामान्य प्रशासन) आणि आरोग्य प्रमुख यांनी तात्काळ मा. महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका यांचे मान्यतेने तात्काळ करण्यात यावे.

तरी या आदेशान्वये क्वारंटाईन/कोव्हिड केअर सेंटरबाबत करावयाच्या उपाययोजनांबाबत खालीलप्रमाणे असे सुस्पष्ट निर्देश देण्यात येत आहेत.

अ) **Institutional Quarantine Centre (IQC)**

(१) सर्व प्रथम निश्चीत करण्यात आलेल्या केंद्रांची विहीत नमुन्यातील चेकलिस्ट संबंधीत महापालिका सहाय्यक आयुक्त यांनी भरून उप आयुक्त, मालमत्ता व्यवस्थापन विभाग यांचेकडे सादर करावयाची आहे.

(२) इन्स्टीट्यूशन क्वारंटाईन केंद्र निश्चीत करताना त्यामधील खोल्या, खाटांची उपलब्धता, शौचालय, स्नानगृहे यांची संख्या, होस्टेल असल्यास तेथे विद्यार्थ्यांचे साहित्य आहे किंवा कसे याची खात्री करणे, केंद्रांवर उपलब्ध साहित्य इत्यादी बाबींची खात्री सर्व परिमंडळ उप आयुक्त व महापालिका सहाय्यक आयुक्त यांनी वैयक्तिकरित्या करावयाची आहे.

(३) क्वारंटाईन सेंटर येथे मुख्यत: निगेटिव्ह व्यक्ति ठेवण्यात येणार असल्याने खोलीची जास्तीत जास्त क्षमता वापरण्यात यावी.

(४) क्वारंटाईन सेंटर येथे डेटा एन्ट्री करण्यासाठी कर्मचारी नेमणे, आवश्यक सुरक्षा व्यवस्था करणे. तसेच संगणक साहित्य, स्टेशनरी इत्यादी उपलब्ध करून देणे इत्यादी कार्यवाही महापालिका सहाय्यक आयुक्त यांची करावी.

(५) क्वारंटाईन सेंटरमध्ये १४ दिवसांचा कालावधी पूर्ण केलेल्या व्यक्तिंना घरी सोडताना हातावर होम क्वारंटाईन शिक्के मारण्यात यावेत, तसेच त्यांनी घरी पालन करण्याच्या सूचनांचे पत्रक Sanitization kit उपलब्ध करून देण्यात यावे.

(६) एखाद्या क्वारंटाईन सेंटरमधून काही अपरिहार्य कारणास्तव तेथील व्यक्तिंना अन्य क्वारंटाईन सेंटरमध्ये पाठविणे आवश्यक असल्यास त्यांचा डेटा यामध्ये त्यांचे नाव, वय, पत्ता, केंद्रात दाखल झाल्याची तारीख, मो. नंबर याची नोंद नवीन क्वारंटाईन सेंटरकडे विशेष नोडल अधिकारी यांचेमार्फत पाठविण्यात यावी.

ब) **प्रतिक्षाधीन केंद्रांबाबत** (Awaited Centres) :-

(१) प्रत्येक परिमंडळ उप आयुक्त यांनी त्यांच्या झोनमधील वॉर्डनिहाय एकूण मनपाच्या १० शाळा व ५ मंगल कार्यालय तसेच पुणे मनपाची सांस्कृतिक केंद्रे, बहुउद्देशिय हॉल व क्रिडा संकुल ही निश्चीत करावी. त्या ठिकाणी सँपल कलेक्शनसाठी आणलेल्या व्यक्तिंना ठेवण्याची व्यवस्था करावी.

(२) सदर व्यक्तिंना ठेवताना शक्यतो एका खोलीत एका कुटुंबातील व्यक्तिंना ठेवण्यात यावे.

(३) जागेच्या उपलब्धतेनुसार व्यक्तिंना ठेवताना सोशल डिस्टन्सींगचे पालन काटेकोरपणे करण्यात यावे.

(४) अशा वेळी ज्या वॉर्डातुन हे रूग्ण अथवा त्यांचे नातेवाईक यांना स्वॅब नमुना तपासणीसाठी आणण्यात येईल त्यावेळी त्यांना तपासणी अहवालानंतर सदर केंद्रावर १५ दिवस राहावे लागणार असल्याचे व त्याकरीता आयसोलेशन कालावधीसाठी लागणारे आवश्यक वैयक्तिक सहित्य (टॉवेल, अंडरगारमेंट, कपडे, टुथपेस्ट, ब्रश, इत्यादी) सोबत ठेवणे जरूरीचे असल्याची कल्पना देणे आवश्यक आहे.

(५) सदर ठिकाणी त्यांची नावे व पत्ते यांची डेटा एन्ट्री करण्यात यावी आणि अशा व्यक्तिंचे नाव, वय आणि कारणांसह यादी तयार करावी.

(६) त्यांना मास्क पुरविण्यात यावे.

(७) या प्रतिक्षा केंद्रावर सदर व्यक्तिंकरीता चहा–नाष्टा/जेवणाची सोय संबंधीत महापालिका सहाय्यक आयुक्त यांनी करावी. या केंद्रांवरून सदर व्यक्तिंचे स्वॅब घेण्यासाठी उपलब्ध स्वॅब टेस्टींग सेंटरवरल नियुक्त डॉक्टरांशी संपर्क साधून स्वॅब टेस्टींगचे नियोजन करावे.

(८) स्वॅब टेस्टींगचा रिपोर्ट आल्यानंतर अहवाल प्राप्त झाल्यानंतर वैद्यकीय पथकाशी चर्चा करून त्यांचे सूचनेनुसार, निगेटीव्ह व्यक्तिंना पुणे मनपाच्या IQC सेंटरवर वा त्यांच्या घरी आवश्यक ती जागा उपलब्ध असल्यास होम क्वारंटाईन करण्यासाठी सोडण्यात यावे. Mild Symptoms असणाऱ्या व्यक्तिंना डॉक्टरांच्या निर्देशाप्रमाणे पुणे मनपाच्या CCC केंद्रांवर/हॉस्पिटलमध्ये पाठविण्यात यावे. हे करताना संबंधीत CCC / हॉस्पिटलच्या वैद्यकीय पथकाकडे संपर्क साधून या पुढचे नियोजन करावे.

(९) आरोग्य विभागाने पॉझिटिव्ह पेशंट आढळून आल्यानंतर अशा पॉझिटिव्ह पेशंटना CCC ला पाठविण्यासाठी एका नोडल डॉक्टरची नियुक्ती करावी. तथापि पॉझिटिव्ह पेशंट हे Ambulance मार्फत पाठविण्यात यावेत याची दक्षता घेण्यात यावी.

(१०) उपरोक्त कोरोना बाधित रूग्णांच्या संपर्कात आलेल्या व्यक्तिंचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर पॉझिटिव्ह रूग्णांना संबंधीत वैदयकीय अधिकारी यांनी योग्य त्या उपचारासाठी पुणे मनपाच्या कोव्हिड हॉस्पिटलमध्ये दाखल करणेबाबत निर्णय घ्यावा.

(११) प्रतिक्षा केंद्रावरून सदर व्यक्तिंना कोठे पाठविण्यात आले याबाबतची कल्पना संबंधीत महापालिका सहाय्यक आयुक्त व वैद्यकीय अधिकारी यांनी त्या व्यक्तिंना ज्या भागातून आणले आहे त्या प्रभागाच्या महापालिका सहाय्यक आयुक्त व वैद्यकीय अधिकारी यांना देण्यात यावी.

## क) Covid Care Centre (CCC) : -

(१) कोव्हीड केअर सेंटर येथे आणण्यात येणाऱ्या रूग्णांना/व्यक्तिंना माहिती पत्रक (**सोबत नमुना**) देण्यात येऊन त्यात नमूद बाबी स्पष्ट सांगण्यात याव्यात.

(२) CCC येथे आवश्यक वैद्यकीय अधिकारी Para Medical Staff यांची नियुक्ती आरोग्य विभागामार्फत करण्यात यावी. क्षेत्रिय परिमंडल उप आयुक्त यांचेमार्फत आस्थापना व केंद्राच्या व्यवस्थेबाबत (भोजन व्यवस्था, स्वच्छता, प्रशासकीय कामकाज) याकरीता आवश्यक तो कर्मचारी

वर्ग नियुक्त करण्यात यावा. CCC येथे आवश्यक ती सुरक्षा व्यवस्था सुरक्षा विभाग व पोलीस विभागामार्फत घेण्यात यावी.

(३) CCC येथे दोन व्यक्तींमध्ये ५ फुटांपेक्षा कमी अंतर नसावे, अशा पद्धतीने निवास व्यवस्था करण्यात यावी.

(४) CCC मध्ये वैद्यकीय पथकामार्फत दररोज सर्व व्यक्तींची तपासणी करण्यात यावी.

(५) भोजन व्यवस्थेबाबत शक्यतो Pre Packed Lunch देण्याबाबत कार्यवाही करावी.

(६) IQC तसेच कोव्हीड सेंटर येथे प्रत्येक व्यक्तीला मास्क लावणे बंधनकारक करण्यात यावे.

(७) CCC तसेच कोव्हीड सेंटर येथे पब्लिक अॅड्रेस सिस्टीमची व्यवस्था करण्यात यावी.

(८) पेशंटला डिस्चार्ज दिल्यानंतर त्याने वापरलेली चादर, बेडशीट या निर्जंतुकीकरण करण्यात याव्यात.

तसेच पुणे शहरातील कोरोना बाधित रूग्णांची वाढती संख्या विचारांत घेता CCC बाबत आगामी नियोजन करणे आवश्यक असल्याने सोबत परिशिष्ट 'ब' मध्ये जोडलेल्या तक्त्यानुसार प्रस्तावीत CCC व ते कार्यरत करण्याचा दिनांक त्यामध्ये नमुद केलेला आहे. तरी सर्व संबंधीत परिमंडळ उप आयुक्त व महापालिका सहाय्यक आयुक्त यांनी त्यांचे कार्यक्षेत्रातील CCC केंद्रांमध्ये आवश्यक ती पुर्व तयारी स्टाफचे नियोजन, आवश्यक साहित्य भांडार विभागाकडून प्राप्त करून घेणे. भोजन व्यवस्था व स्वच्छतेकरीता आवश्यक त्या प्रशासकीय प्रक्रियेचा अवलंब करून यंत्रणा निश्चीत करणे इ. कार्यवाही तात्काळ सुरु करावी.

तसेच माझे असेही निदर्शनास आले आहे की, अनेकवेळा CCC वर जागा उपलब्ध असतांनादेखील पेशंट नाकारण्यात येतात. तरी याबाबत सक्त निर्देश देण्यात येत आहेत की, यापुढे ज्या CCC वर जागा उपलब्ध असूनही पेशंट नाकारण्यात आल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात येईल. तसेच काही अपरिहार्य कारण असल्यास प्रथम उप आयुक्त (मालमत्ता व्यवस्थापन विभाग) यांचेशी बोलावे व आवश्यकता व वस्तुस्थितीचे गांभीर्य विचारात घेवून मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (वि) यांचे निर्देश प्राप्त करूनच पुढील निर्णय घेण्यात यावा.

उपरोक्त निर्देशांचे सर्व संबंधितांनी काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे. सदर निर्देशांचे उल्लंघन झाल्यास अथवा त्यांची अंमल बजावणी करण्यात कुचराई झाल्यास उपरोक्त नमुद अधिनियमान्वये संबंधीतांविरुद्ध कठोर कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

(शेखर गायकवाड)
**महापालिका आयुक्त**
पुणे महानगरपालिका

**सोबत:-** सहपत्र

१) **परिशिष्ट 'अ'** – सूचनापत्रक

२) **परिशिष्ट 'ब'** – CCC संस्था यादी

३) **परिशिष्ट 'क'** – मंगल कार्यालय यादी

४) **परिशिष्ट 'ड'** – मनपा शाळा यादी

५) **परिशिष्ट 'इ'** – संबंधीत केंद्र प्रमुख व खातेप्रमुखांची जबाबदारी

# परिशिष्ट 'अ'

## -: सूचनापत्रक :-

### क्वारंटाईन/कोव्हीड केअर सेंटरवर खालील बाबींचा स्पष्ट उल्लेख असावा.

१) संबंधीत व्यक्ती/रूग्ण जे नियमित ओषधे घेत आहेत. त्यांनी किमान २० दिवसांचा औषधांचा साठा सोबत घेऊन यावे किंवा तो साठा उपलब्ध नसल्यास ती व्यक्ती/रूग्ण जे औषध घेत आहेत त्याची माहिती लेखी स्वरूपात टेस्टींग/ॲडमिशन फॉर्मवर भरून देईल. या औषधांमध्ये रक्तदाब, डायबिटीजसाठी औषध किंवा इतर कोणत्याही रोगाचे औषध उपचार झालेला असेल त्या औषध उपचारांचा उल्लेख असेल.

२) ज्या व्यक्तींना स्वत:ची एक किंवा दोन चादर आंथरण्यासाठी व पांघरण्यासाठी शाल आणावयाची असेल तर त्यांना त्याची मुभा असेल.

३) संबंधीत व्यक्तीची चाचणी घेतल्यानंतर २४ ते ४८ तासांसाठी त्या व्यक्तीला क्वारंटाईन सेंटरमध्ये रहावे लागेल, याची त्यांना जाणीव करून द्यावी. तसेच ज्या व्यक्ती पॉझिटीव्ह असतील त्या व्यक्तींना किमान १४ दिवसांसाठी कोव्हीड केअर सेंटर/हेल्थ सेंटर/कोव्हीड हॉस्पिटलमध्ये रहावे लागेल याची त्यांना जाणीव करून द्यावी.

४) तसेच या कोरोना केअर सेंटर/क्वारंटाईन सेंटरच्या केंद्र प्रमुखाचे नाव आणि तेथील सुविधां बाबतीत काही तक्रार असल्यास कोणाशी संपर्क करावा याबाबतचा व्हॉटसअप/ मोबाईल क्रमांक किंवा ईमेल आयडीचा स्पष्ट उल्लेख असावा.

५) प्रत्येक केंद्रामध्ये ट्रिपल लेअर मास्क उपलब्ध आहेत किंवा नाही ? याची खात्री करावी आणि वापरलेल्या मास्कचे डिस्पोजल करण्याची व्यवस्था असावी.

| परिशिष्ट ब | | | |
|---|---|---|---|
| कोविड केअर सेंटर यादी (CCC) | | | |
| अ.क्र | | बेडची संख्या | कार्यान्वित केल्याचा दिनांक/ तपशील |
| १ | सिंहगड इंजिनिअरींग कॉलेज, स.नं ४१/१ , वडगाव बु., **ए विंग** | ३०० | कार्यान्वित आहे. |
| २ | निकमार सिल्वर जुबिली, बालेवाडी | १५० | कार्यान्वित आहे. |
| ३ | निकमार मिलेनियम गर्ल्स होस्टेल, बालेवाडी | १७० | कार्यान्वित आहे. |
| ४ | मुरलीधर लायगुडे हॉस्पिटल, धायरी | ५० | कार्यान्वित आहे. |
| ५ | द्रौपदाबाई खेडेकर हॉस्पिटल, बोपोडी | ५० | कार्यान्वित आहे. |
| ६ | बाबुराव सणस ग्राउंड, सारसबाग | १५० | कार्यान्वित आहे. |
| ७ | रक्षकनगर क्रीडा संकुल, खराडी | १०० | कार्यान्वित आहे. |
| ८ | निकमार अल्टीमा होस्टेल, बालेवाडी | ३०० | कार्यान्वित आहे. |
| ९ | निकमार मिलेनियम बॉइज होस्टेल, बालेवाडी | ३९० | कार्यान्वित आहे. |
| १० | सिओइपी, शिवाजीनगर | ३५० | ०४.०५.२०२० |
| ११ | श्री. शिव छत्रपती क्रीडा संकुल, म्हाळुंगे-बालेवाडी | १००० | ०४.०५.२०२० |
| १२ | मराठवाडा इंजीनिअरिंग कॉलेज, कर्वेनगर | २०० | ०४.०५.२०२० |
| १३ | सिम्बिओसीस होस्टेल, विमाननगर | २०० | ०४.०५.२०२० |
| १४ | ट्रिनीटी कॉलेज, बोपदेव घाट | २०० | ०४.०५.२०२० |
| १५ | एस.एन.डी.टी., कर्वे रोड | ३०० | ०४.०५.२०२० |
| १६ | गरवारे कॉलेज , कर्वेरोड | १५० | ०७.०५.२०२० |
| १७ | फर्गुसन कॉलेज, | १०० | ०७.०५.२०२० |
| १८ | एम.आय.टी. कॉलेज, पौडरोड, कोथरूड | १५० | ०७.०५.२०२० |
| १९ | भारतीय जैन संस्था, वाघोली | २०० | ०७.०५.२०२० |
| २० | एस.एम.जोशी कॉलेज, हडपसर | ११७ | १०.०५.२०२० |
| २१ | सिंहगड कॉलेज, **कोंढवा** | २०० | १०.०५.२०२० |
| २२ | सिंहगड इंजिनिअरींग कॉलेज, स.नं ४१/१ , वडगाव बु., **पन्हाळा होस्टेल** | ३०० | १०.०५.२०२० |
| २३ | सिंहगड इंजिनिअरींग कॉलेज, स.नं ४१/१ , वडगाव बु., **बी विंग** | ३०० | १०.०५.२०२० |
| २४ | सिंहगड इंजिनिअरींग कॉलेज, स.नं ४१/१ , वडगाव बु., **सी विंग** | ३०० | १०.०५.२०२० |
| २५ | सिंहगड इंजिनिअरींग कॉलेज, स.नं ४१/१ , वडगाव बु., **रायगड होस्टेल** | ३०० | १५.०५.२०२० |
| २६ | आय.टी.आय., औंध | १२० | २०.०५.२०२० |
| २७ | जी.पी.पी., गणेशखिंड रोड | १२० | २०.०५.२०२० |
| २८ | संत ज्ञानेश्वर होस्टेल, येरवडा | ३०० | २०.०५.२०२० |
| २९ | कमिन्स कॉलेज, कर्वेनगर | ३०० | २१.०५.२०२० |
| ३० | भारती विद्यापीठ, कोथरूड | २०० | २२.०५.२०२० |
| | **एकूण बेडची संख्या** | **७०६७** | |

| परिशिष्ट क | | |
|---|---|---|
| अ.क्र. | मंगल कार्यालय/कम्युनिटी हॉल यादी | प्रकार |
| १ | श्री. बापुसाहेब रघुनाथ शिळमकर, लक्ष्मी मंगल कार्यालय, ११/७, गुलटेकडी, पुणे. | मंगल कार्यालय |
| २ | शिवशंकर सभागृह, बालब्रम्हचारी व्यांघबरी बुवा देवस्थान ट्रस्ट, ६९८/१, महर्षीनगर, प्लॉट नं.४१७, गुलटेकडी, पायगुडे बाग, पुणे. | मंगल कार्यालय |
| ३ | श्री. विरेन्द्र माणिलाल पारेख, प्रिन्स मंगल कार्यालय, ३६/२, शंकरशेठ रोड, गुलटेकडी, पुणे. | मंगल कार्यालय |
| ४ | श्री. हरी आत्माराम सायतानी, जानकी हॉल, २६/१, स्वारगेट, शंकरशेठ रोड, पुणे. | मंगल कार्यालय |
| ५ | श्री.सुभाष चंदुलाल तालेरा, तालेरा गार्डन, ५५९,२ अ हिस्सा नं. २ब १/१/२, मंजेरी, मार्केटयार्ड, पुणे. | मंगल कार्यालय |
| ६ | श्री. तुषार बाळासाहेब झाड, शाही शहनाई हॉल (अनुसुया हॉल), ४७३अ/३१, गुलटेकडी, पुणे. | मंगल कार्यालय |
| ७ | श्री.पुष्पक जुगमंदर शहा, पुष्पक मंगल कार्यालय, २/२२६, ३९, वडगाव बु. पुणे. | मंगल कार्यालय |
| ८ | श्री.गणेश भिमराव कुलकर्णी, सिध्दार्थ हॉल, ३९/२, नॅशनल पार्क, वडगाव बु., पुणे. | मंगल कार्यालय |
| ९ | श्रीमती विजया शांताराम शिरोडकर, उत्सव मंगल कार्यालय, ५४/५अ, हायवे टोल नाक्यासमोर, वडगाव बु., पुणे. | मंगल कार्यालय |
| १० | श्री.विजय ज्ञानेश्वर शेंडकर, ज्ञानल मंगल कार्यालय, १/१,रामबाग कॉलनी, नवी पेठ, पुणे. | मंगल कार्यालय |
| ११ | श्री.विजय ज्ञानेश्वर शेंडकर, संकल्प मंगल कार्यालय, १/१, रामबाग कॉलनी, नवी पेठ, पुणे. | मंगल कार्यालय |
| १२ | श्रीमती पुष्पा शंकर थषे, उद्यान कार्यालय, १७१२/१ब, सदाशिव पेठ, पुणे. | मंगल कार्यालय |
| १३ | श्री.जगन्नाथ रघुनाथ तावरे,सुरभी मंगल कार्यालय, तावरे कॉलनी, प्लॉट नं. १३/१४, पुणे. | मंगल कार्यालय |
| १४ | सौ.कांचन अनंत चिकसकर, श्री महालक्ष्मी सभागृह, ३१२/२, पर्वती, पुणे. | मंगल कार्यालय |
| १५ | अंजली दिनकर दातार, हरिप्रिया सभागृह, ११९/३/४, पर्वती, सिंहगड रस्ता, पुणे. | सभागृह हॉल |
| १६ | संजय मुंकुद लेले, गोवर्धन मंगल कार्यालय, ३२४, शनिवार पेठ, पुणे. | मंगल कार्यालय |
| १७ | वरदश्री सभागृह, श्री. पुरुषोत्तम एस. सहस्त्रबुध्दे, १३५८/ अ, शुक्रवार पेठ, पुणे. | मंगल कार्यालय |
| १८ | निलकमल मंगल कार्यालय, श्री. शिवाजी रामभाउ तुपे, स.नं. ११/१, हडपसर, गाडीतळ, सोलापुर रोड, पुणे. | मंगल कार्यालय |
| १९ | कन्यादान ममल कार्यालय, श्री. दिंगवर रामभाऊ ससाणे, सं.न.१६३ /२ ए, सोलापुर रोड, हडपसर, पुणे. | मंगल कार्यालय |
| २० | ग्रीन कोर्ट मंगल कार्यालय, उत्तमराव सदाशिवराव केदारी, वानवडी केदारी गार्डन, स.नं.१४/१ अ+१ब, पुणे-४०. | मंगल कार्यालय |
| २१ | श्री क्षत्रीय मंडळ ट्रस्ट, श्री.देवीदास जे कापडीया, स.नं. ६५ ४/१, अ/१३, वानवडी, पुणे-१३. | मंगल कार्यालय |
| २२ | पाडळे पॅलेस, श्री. आलोक हरिहर गोळे, भागीदार, अशोक सोसा., लॉ कॅालेज रोड, पाडळे पॅलेस, ११, एरंडवणा, पुणे. | मगल कार्यालय |
| २३ | मनोहर मंगल कार्यालय, एम. के. मेहंदळे, ट्रान्सपोर्ट प्रा.लि. तर्फे, मॅनेजिंग डायरेक्ट्र, श्री. शीम मओहर मेंहदळे, ३१/१, एरंडवणा, पुणे. | मंगल कार्यालय |
| २४ | उत्सव सभागृह, श्री. अरविंद निलकंठ गोडबोले, प्लॉट क्र. १८, स.न. ८९/९, लोकमान्य कॅालनी, कोथरुड, पुणे. | सभागृह |
| २५ | जिंजाई गार्डन व हॅाल, श्री. संजय बाबुराव बराटे, सं.न.१५/३, तपोधाम रस्ता , वारजे, पुणे. | मंगल कार्यालय |
| २६ | सुजय हॅाल, श्री. जंयत देवगावकर न्याती, एलोगन्स हॅपी कॅालनी, ग.क्र.४, कोथरुड, पुणे. | मंगल कार्यालय |
| २७ | काकडे पॅलेस, श्री. संजय दत्तात्रय काकडे, स.न. २३+२४ +२५+५७+५८+१, कर्वेनक्षर, पुणे-५२. | मंगल कार्यालय |
| २८ | अॅसेन्ट हॅाटेल्स प्रा.लि., जाठिया आर्दश राजकुमार, वेकफिल्द आय टी सिटी, इन्फो पोर्क, सं.न.३२/१ अ, ब वडगावशेरी, नगर रोड़, पुणे-१४. | बॅक्वेट हॅाल |
| २९ | ड्युष्ट इंडिया हॅाटेल्स पुणे प्रा.लि. फोर पॅाईन्ट द्वारा शेरटोन, श्री. विजयन गंगाधरन, सं.न.१९७/३, नगर रोड, विमानगर, लोहगाव, पुणे. | बॅक्वेट हॅाल |
| ३० | हर्षल हॅाल, श्री. कासट हरिविलास रामनाथ, स.नं. १५३, कोथरूड, कर्वे रोड, पुणे. | मंगल कार्यालय |
| ३१ | विठ्ठलांजन मंगल कार्यालय, वडगाव शेरी, पुणे | मंगल कार्यालय |
| ३२ | रामचंद्र सभागृह, वडगाव शेरी, पुणे | मंगल कार्यालय |
| ३३ | संतोष हॅाल, आनंदनगर, सिंहगड रोड. | सभागृह |
| ३४ | मुक्ताई गार्डन, धायरी गाव | मंगल कार्यालय |
| ३५ | प्रतिज्ञा मंगल कार्यालय, कर्वेनगर | मंगल कार्यालय |
| ३६ | मराठा मंदीर, बावधन पाषाण रोड | मंगल कार्यालय |
| ३७ | राजलक्ष्मी हॅाल, कोथरूड | सभागृह |
| ३८ | धानोरी स.नं.४८ हॅाल, अंबानगरी जवळ | सभागृह |
| ३९ | नंदादीप लॅान्स , डी.पी. रोड, म्हात्रे पुला जवळ | मंगल कार्यालय |
| ४० | शुभारंभ लॅान्स , डी.पी. रोड, म्हात्रे पुला जवळ | मंगल कार्यालय |
| ४१ | घरकुल लॅान्स , डी.पी. रोड, म्हात्रे पुला जवळ | मंगल कार्यालय |
| ४२ | रानडे मन्जटा (सूर्यनंदा लॅान्स) डी.पी. रोड, म्हात्रे पुला जवळ | मंगल कार्यालय |
| ४३ | माउली गार्डन , मंगल कार्यालय , बाणेर | मंगल कार्यालय |
| ४४ | कुंदन गार्डन , बाणेर | मंगल कार्यालय |
| ४५ | गोविंद मंगल कार्यालय, बाणेर | मंगल कार्यालय |
| ४६ | बंटस संघ, बाणेर | मंगल कार्यालय |
| ४७ | सिद्धी गार्डन ,एरंडवना | मंगल कार्यालय |

## परिशिष्ट - ड

### शिक्षण विभाग पुणे मनपा प्राथमिक व माध्यमिक शाळा इमारतींची यादी

| अ.क्र | परीमंडळ क्र. | क्षेत्रिय कार्यालयाचे नाव | समाविष्ट वस्ती | शाळेचे नाव व पत्ता | उपलब्ध खोल्या | हॉल | संबंधित सहाय्यक प्रशासकीय अधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | १ | येरवडा-कळस-धानोरी | येरवडा | नेताजी सुभाषचंद्र बोस माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, येरवडा पुणे | २० | १ | श्री. सुभाष सातव मो. क्र ९७६७५९२३९४ |
| | | | | अनुसयाबाई सावंत प्राथमिक शाळा, गणेशनगर, येरवडा पुणे | २० | ० | |
| २ | | येरवडा-कळस-धानोरी | लक्ष्मीनगर येरवडा | स्वातंत्र्य सेनानी हकीम अजमलखान उर्दू माध्यमिक विद्यालय, लक्ष्मीनगर, येरवडा पुणे | ११ | १ | |
| | | | | शहीद अब्दुल हमीद उर्दू प्राथमिक विद्यालय, लक्ष्मिनगर, येरवडा पुणे | १५ | ० | |
| | | | | कर्नल यंग प्राथमिक शाळा, येरवडा पुणे | १२ | ० | |
| ३ | | येरवडा-कळस-धानोरी | धानोरी | बाबुराव माधवराव टिंगरे प्राथमिक शाळा, धानोरी रोड पुणे | १२ | १ | |
| ४ | | ढोले पाटील | ताडीवाला रोड लुम्बिनी नगर, प्रायव्हेट रोड | महात्मा फुले प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, ताडीवाला रोड पुणे | २९ | २ | श्री. विजय आवारे मो. क्र. ९५५२५६१६७३ |
| ५ | | ढोले पाटील | रास्ता पेठ + रविवार पेठ | शांताबाई लडकत प्राथमिक शाळा, नाना पेठ पुणे | १८ | ० | |
| ६ | २ | शिवाजीनगर-घोले रोड | वाकडेवाडी | डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्राथमिक शाळा, संभाजीनगर वाकडेवाडी पुणे | १२ | १ | श्री. शिवाजी अढागळे मो. क्र. ९६८९९३१४७२ |
| ७ | | शिवाजीनगर-घोले रोड | नरवीर तानाजी वाडी | न.ता.वाडी प्राथमिक शाळा न.ता.वाडी, पुणे | ६ | | |
| ८ | ३ | सिंहगड रोड | जनता वसाहत | सीताराम नारायण गावडे प्राथमिक शाळा, जनता वसाहत पुणे | १४ | १ | श्री. सचिन काळे मो. क्र. ९०११११५५०९ |
| ९ | ४ | वानवडी-रामटेकडी | कोंढवा बु. | संत गाडगेमहाराज प्राथमिक शाळा, कोंढवा खु. पुणे | ३३ | १ | श्री. वसिम सय्यद मो. क्र. ९९६०४०५२२१ |
| १० | | कोंढवा-वानवडी | विकासनगर, वानवडी | महादजी शिंदे प्राथमिक शाळा, वानवडी गाव पुणे | १२ | १ | |
| ११ | | हडपसर-मुंढवा | सय्यदनगर, मोहम्मदवाडी | मौ. अब्दुल कलाम आझाद प्राथमिक शाळा सदाशिव नगर, हडपसर पुणे | १० | ० | श्री. सुरेश उचाळे मो. क्र. ८६०५७५९५९५ |
| | | | | मारुतराव काळे प्राथमिक शाळा, काळेबोराटे नगर | १६ | ० | |
| | | | | नर्मदाबाई किसन कांबळे, गोसावीवस्ती | २० | ० | |

## परिशिष्ट - ड

### शिक्षण विभाग पुणे मनपा प्राथमिक व माध्यमिक शाळा इमारतींची यादी

| अ.क्र | परीमंडळ क्र. | क्षेत्रिय कार्यालयाचे नाव | समाविष्ट वस्ती | शाळेचे नाव व पत्ता | उपलब्ध खोल्या | हॉल | संबंधित सहाय्यक प्रशासकीय अधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १२ | ५ | बिबवेवाडी | गुलटेकडी + डायस प्लॉट | संत नामदेव माध्यमिक विद्यालय महर्षीनगर पुणे | १७ | १ | श्री. शरद यादव मो. क्र. ९४०५८५४९४५ |
| | | | | संत ज्ञानदेव प्राथमिक शाळा, महर्षीनगर पुणे | ७ | १ | |
| १३ | | भवानी पेठ | लोहियानगर + खडकमाळ | महात्मा गांधी प्राथमिक शाळा, घोरपडी पेठ पुणे | २८ | ० | श्री. शरद मेमाणे मो.क्र. ९३७०२४९०९२ |
| १४ | | भवानी पेठ | भवानी पेठ | केशवराव जेधे प्राथमिक शाळा, गंज पेठ पुणे | ८ | ० | |
| १५ | | भवानी पेठ | काशेवाडी | रफी अहमद किडवाई उर्दू माध्यमिक विद्यालय, टिंबर मार्केट भवानी पेठ पुणे | १२ | १ | |
| १६ | | भवानी पेठ | काशेवाडी | सावित्रीबाई फुले प्राथमिक व माध्यमिक विद्यालय टिंबर मार्केट, भवानी पेठ पुणे | १४ | १ | |
| १७ | | भवानी पेठ | काशेवाडी | क्रांतीवीर लहूजी वस्ताद साळवे प्राथमिक विद्यालय, भवानी पेठ पुणे | १६ | १ | |
| १८ | | विश्रामबागवाडा | दत्तवाडी | धर्मवीर संभाजी प्राथमिक शाळा, नवी पेठ पुणे | ९ | १ | श्रीमती. शिल्पकला रंधवे मो. क्र. ९०११६०७८९९ |
| १९ | | विश्रामबागवाडा | कामगार पुतळा | बाबुराव सणस कन्या शाळा व मा. शाळा, मंगळवार पेठ, पुणे | २० | १ | |

अति.महा.आयुक्त (ज) कार्यालय,
आस्थापना विभाग, पुणे मनपा.
जा.क्र. :- अतिमआ/साप्रवि/आस्था/२५६
दिनांक :- २०/०८/२०२०

-: कार्यालयीन आदेश :-

विषय :- कोरोना विषाणू प्रतिबंधात्मक उपायाबाबत.
कोरोना संशयित व कोरोना बाधित रुग्णांच्या उपचाराचे नियोजनाबाबत.

संदर्भ :- १) साथरोग अधिनियम १८९७ ची अंमलबजावणी सुरु झाल्याबाबतची अधिसूचना दि.१३.०३.२०२०.
२) महाराष्ट्र कोविड १९ उपाययोजना नियम,२०२०.
३) केंद्रीय आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५
४)आरोग्य कार्यालय जा.क्र. एचओ/२०५, दि. १०/०४/२०२०

पुणे शहरातील कोरोना संशयित व कोरोना बाधित रुग्णांच्या उपचारा करिता पुणे महानगरपालिकेमार्फत परिमंडळ कार्यालय निहाय नियोजन करण्यात आलेले आहे.

त्यानुषंगाने नव्याने सुरु करण्यात येणाऱ्या फ्ल्यू क्लिनीक / Isolation / Quarantine कक्ष येथे करावयाच्या कामाची विभागणी व जबाबदारी खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | फ्ल्यू क्लिनीक / Isolation / Quarantine कक्षा करिता कामाचे नाव/ स्वरूप | जबाबदार अधिकारी | मोबाईल नंबर |
|---|---|---|---|
| १ | फ्ल्यू क्लिनीक / Isolation / Quarantine कक्षामध्ये लागणारे फर्निचर तसेच पलंग, खुर्ची इ. आणि इतर स्थापत्य विषयक कामे आरोग्य अधिकारी यांच्या सल्ल्याने | श्री. शिवाजी लंके अधिक्षक अभियंता | ९६८९९३१२७० |
| २ | विद्युत व्यवस्था | श्री. श्रीनिवास कंदूल मुख्य अभियंता (विद्युत) | ९६८९९३१३७४ |
| ३ | अंतर्गत व बाह्य स्वच्छता | डॉ. अंजली साबणे, सहाय्यक आरोग्य अधिकारी व सह महा. आयुक्त (घनकचरा व्यवस्थापन) | ९८२२८७९८३० |
| ४ | वैद्यकीय बाबींशी निगडीत सर्व सोयी सुविधा पुरविणे | डॉ. अंजली साबणे, सहाय्यक आरोग्य अधिकारी | ९६८९९३१४४४ |
| ५ | या सेंटरमध्ये रुग्णांकरिता आवश्यक असणारी सर्व साहित्य जसे पिण्याचे पाणी, साबण, टूथपेस्ट इ. अत्यावश्यक बाबी सर्व (Non Medical Items) | श्री. सुनील इंदलकर उप आयुक्त | ७७९६६५३९६१ |
| ६ | दाखल झालेल्या व बाहेर पडलेल्या रुग्णांची आकडेवारी आणि नियंत्रण, भोजन व अनुषंगिक बाबी | संबंधित परिमंडळ उप आयुक्त | |

| अ.क्र. | फ्ल्यू क्लिनीक / Isolation / Quarantine कक्षा करिता कामाचे नाव/ स्वरूप | जबाबदार अधिकारी | मोबाईल नंबर |
|---|---|---|---|
| ७ | जैविक व अन्यप्रकारचे घनकचरा व्यवस्थापन | डॉ. मनिषा नाईक, सहाय्यक आरोग्य अधिकारी व श्री.सुधीर चव्हाण, कार्यकारी अभियंता | ९८२२८७९८३०, ९६८९९३१७८७ |
| ८ | इमारतींचे अंतर्गत निर्जन्तुकीकरण करणे | डॉ. वैशाली जाधव, सहाय्यक आरोग्य अधिकारी | ९६८९९३१२१२ |
| ९ | पाणीपुरवठा विषयक कामे | श्री.अनिरुद्ध पावसकर प्र.मुख्य अभियंता पाणी पुरवठा विभाग | ९६८९९३१३२४ |
| १० | अग्निशमन व्यवस्था | श्री. प्रशांत रणपिसे मुख्य अग्निशमन अधिकारी अग्निशमन विभाग | ९६८९९३१९९१ |
| ११ | वाहन व्यवस्था | श्री. नितीन उदास, उप आयुक्त | ९६८९९३१५९१ |
| १२ | ॲम्बुलन्स व्यवस्था | संबधित कक्षाचे वैद्यकीय अधिकारी | |
| १३ | सुरक्षा व्यवस्था | श्री.संदिप कदम मुख्य सुरक्षा अधिकारी | ९६८९९३१४२२ |

वरील विषयी स्थापत्य/ विद्युत/ इतर खरेदीचे कामे करत असताना आवश्यकतेबाबत शक्यतो क्षेत्रीय उप आयुक्त यांनी आपली मागणी संबंधित विभागाकडे द्यावी. तसेच, तातडीचे बाब म्हणून काही खरेदी केली असल्यास त्याबाबतची माहिती व बिले भांडार विभागाकडे सादर करावी.

कोणत्याही प्रकारे क्षेत्रीय उप आयुक्त बिले मंजुरी करिता/ प्रकरणे स्वतंत्र सादर करणार नाही. संबंधित विभागाने या कामांच्या संचिका मुख्य लेखा व वित्त अधिकारी व दक्षता विभाग यांचे मार्फत तपासून मान्यतेस्तव सादर करावी.

वरीलप्रमाणे जबाबदारी निश्चित करण्याचे कार्यालयीन आदेश त्यांचे स्तरावर संबंधित उप आयुक्त यांनी निर्गमित करावे आणि त्याप्रम्मणे अंबलबजावणी निश्चित करावी. सदर आदेशाची एक प्रत या कार्यालयाकडे सादर करावी.

20/4/2020

(रुबल अग्रवाल)
अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)
पुणे महानगरपालिका

प्रत -
मा.महापालिका आयुक्त,
मा.अतिरिक्त आयुक्त (वि) यांना माहितीस्तव.
प्रती –
संबंधीत मा. खातेप्रमुख/प्रशासन अधिकारी, पुणे महानगरपालिका